Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५/ ४७५ — दिनांक : २९.०१.२०२५

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक/परीक्षा केंद्र प्रमुख,**
**सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *

**विषय : बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्ष प्रथम सत्र (Pattern- NEP 2024) अभ्यासक्रमांच्या मूल्यमापन झालेल्या उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या व इतर दस्तऐवज जमा करणेबाबत.**

संदर्भ : १. परीक्षा/समन्वय/२०२४/३२७, दि. १०.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली कार्यपध्दती.
२. परीक्षा/समन्वय/२०२४/७७८, दि. २०.१२.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले वेळापत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्ष प्रथम सत्र (Pattern- NEP 2024)** अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करुन निकाल घोषित (Home Center & Home Assessment) करण्यात याव्यात व सदर प्रक्रिया ही प्रस्तुत विद्यापीठाने विहित करुन दिल्याप्रमाणे करण्यात यावी असे (संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये) सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये उत्तरपत्रिका मूल्यमापन पूर्ण करणे व इतर अनुषंगीक बाबींबाबत कार्यवाही करण्यासाठी वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

**त्यानुसार मूल्यमापन झालेल्या उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या व इतर दस्तऐवज राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या तारखा कळविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | दिनांक | अभ्यासक्रमांचे नाव |
|---|---|---|---|
| १. | छत्रपती संभाजीनगर (शहर व ग्रामीण) | ०१.०२.२०२५ | **B.A. I Sem<br>B.Com. I Sem<br>B.Sc. I Sem** |
| २. | जालना (शहर व ग्रामीण) | ०३.०२.२०२५ | |
| ३. | बीड (शहर व ग्रामीण) | ०४.०२.२०२५ | |
| ४. | धाराशिव (शहर व ग्रामीण) | ०५.०२.२०५ | |

कृ.मा.पहा

तसेच सर्व संबंधित परीक्षा केंद्रांना उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या व इतर दस्तऐवज संकलन केंद्रावर जमा करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या नियमप्रमाणे प्रवास व दैनंदिन भत्ता (By Bus) देण्यात येईल व परीक्षा केंद्रावरील उत्तरपत्रिकांची संख्या जास्त असल्यास किंवा एकाच शहरातील, तालुक्यातील अंदाजे ४ ते ५ महाविद्यालयांनी एकत्रित प्रवास करण्याचे नियोजन केल्यास प्रस्तुत विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे गाडी भाडे (Car Fare) देण्यात येईल.

करिता, सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्था/परीक्षा केंद्रांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन मूल्यमापन झालेल्या उत्तरपत्रिका, मुळ गुणयाद्या, ऑनलाईन नोंदणी करुन प्रिंट काढलेल्या गुण याद्या व इतर दस्तऐवज विहित करुन दिलेल्या पध्दतीनुसार निश्चित करुन दिलेल्या ज्या-त्या तारखेलाच सादर करण्यात यावे; ही विनंती.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University • Chhatrapati Sambhajinagar • Assessed by NAAC "A" Grade

संचालक
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**